**बेकायदेशीरपणे स्थापन केलेल्या तथाकथित लवाद न्यायालयाशी संबंधित बाबी**

27 जून 2025

आज, सिंधू जल करार 1960 अंतर्गत कथितपणे स्थापन केलेल्या बेकायदेशीर लवाद न्यायालयाने, स्पष्टपणे कराराचे उल्लंघन करत, जम्मू आणि काश्मीरच्या भारतीय केंद्रशासित प्रदेशातील किशनगंगा आणि रॅटल जलविद्युत प्रकल्पांबाबत त्यांच्या क्षमतेनुसार "पूरक निवाडा" घोषित केला आहे.

2. भारताने या तथाकथित लवाद न्यायालयाचे अस्तित्व कायदेशीररित्या कधीच मान्य केलेले नाही आणि भारताची नेहमीची भूमिका अशी राहिली आहे की या तथाकथित लवाद संस्थेची स्थापना ही स्वतःच सिंधू जल कराराचे गंभीर उल्लंघन आहे आणि परिणामी या मंचासमोरील कोणतीही कार्यवाही आणि त्यांनी दिलेला कोणताही निवाडा किंवा घेतलेला कोणताही निर्णय देखील त्याच कारणास्तव बेकायदेशीर आणि स्वतःच रद्दबातल आहे.

3. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, भारताने आंतरराष्ट्रीय कायद्यांतर्गत एक सार्वभौम राष्ट्र म्हणून आपल्या अधिकारांचा वापर करून जोपर्यंत पाकिस्तान विश्वासार्हपणे आणि अपरिवर्तनीयपणे सीमापार दहशतवादाला पाठिंबा देण्यास नकार देत नाही तोपर्यंत सिंधू जल करार स्थगित केला आहे. जोपर्यंत हा करार स्थगित झालेला असेल तोपर्यंत, भारत या करारांतर्गत असलेल्या कोणत्याही दायित्वांचे पालन करण्यास बांधील नाही. कोणत्याही लवाद न्यायालयाला, कायद्याच्या दृष्टीने अस्तित्वात नसलेल्या या बेकायदेशीरपणे स्थापन केलेल्या लवाद संस्थेला तर दूरच, सार्वभौम म्हणून भारताच्या अधिकारांचा वापर करण्याच्या कृतींचा कायदेशीरपणा तपासण्याचा अधिकार नाही.

4. त्यामुळे, भारत या तथाकथित पूरक निवाड्याला स्पष्टपणे फेटाळत आहे कारण त्याने या संस्थेच्या सर्व पूर्वीच्या अधिकृत घोषणा नाकारल्या आहेत.

5. पाकिस्तानच्या इशाऱ्यावरून केलेला हा नवीनतम निव्वळ देखावा दहशतवादाच्या जागतिक केंद्रस्थानी असलेल्या भूमिकेसाठी जबाबदार असल्याच्या वस्तुस्थितीपासून सुटका मिळवण्याचा पाकिस्तानचा आणखी एक हताश प्रयत्न आहे. पाकिस्तानने या बनावट लवाद यंत्रणेचा अवलंब करणे हे त्याच्या दशकांपासून सुरू असलेल्या फसवणूक आणि आंतरराष्ट्रीय मंचांवर फेरफार करण्याच्या पद्धतीशी सुसंगत आहे.

**नवी दिल्ली**

**27 जून 2025**